**म.सं.कौ.हिं.कि.अर्ज.नं. 75/2022 मधील नि.क. 03 वरील आदेश.**
**(CNR No.MHBI09001480-2022)**
**सफुरा वि. तारेख व इतर**

अर्जदार हिने प्रस्तूतचा अर्ज घरगुती हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा २००५ चे कलम २३ अन्वये अंतरिम पोटगी मिळणेकामी दाखल केला आहे.

**अर्जदाराचे संक्षिप्त कथन खालील प्रमाणे:-**

२. अर्जदार क्र.१ हिचे लग्न गैरअर्जदार क्र.१ सोबत दि.२३.०५.२०१६ रोजी मुस्लीम धर्म रितीरिवाजाप्रमाणे माजलगाव येथे झाले असुन लग्नामध्ये सर्व खर्च एकुण रक्कम रू. १०,००,०००/- अर्जदाराचे आईवडिलांनी केलेला आहे. अर्जदार क्र.१ व गैरअर्जदार क्र. १ यांचे पतीपत्नीचे नातेसंबंध अद्याप कायम आहेत.

३. अर्जदार पुढे असे कथन करते की, लग्नानंतर गैरअर्जदारांनी तिला सुरुवातीचा एक वर्षे चांगले नांदविले. त्यानंतर गैरअर्जदार हा शुल्लक कारणावरून तुला मुलबाळ होत नाही असे म्हणून तसेच टॅक्सी घेण्यासाठी माहेराहून ६०,०००/-रु.च्या मागणीपोटी अर्जदाराचा मानसिक व शारिरीक छळ करू लागले. घडलेल्या घटनेबाबत तिने तिचे आईवडिलांना सांगितले असता त्यांनी गैरअर्जदारांना समजावावून सांगून अर्जदारास चांगले नांदविण्याची विनंती केली परंतु त्यांच्या स्वभावात कोणताही बदल झाला नाही. त्यानंतर अर्जदाराच्या आईवडिलांनी अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ ची थामीन हॉस्पीटल, औरंगाबाद येथे तपासणी केली असता अर्जदाराचे सर्व रिपोर्ट नॉर्मल निघाल्यानंतर गैरअर्जदार क्र.१ यास त्याची तपासणी करण्यास सांगितले असता त्याने इन्कार केला. वरील कारणास्तव व पैशाच्या मागणीपोटी गैरअर्जदारांनी अर्जदार हिस घराबाहेर काढले. त्यानंतर अर्जदाराच्या

आईवडिलांनी अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ यास तिचे माहेरी दोन महिने ठेवले व समजावून सांगितले. शवेटी दि.२०.२.२०२२ रोजी गैरअर्जदारांनी अर्जदारास माहेराहून ६०,०००/-रु. घेवून ये नाही तर तुला नांदवणार नाही अशी धमकी देवून अर्वाच्च भाशेत अर्जदारास नांदविण्यास इन्कार केला. त्यावरून त्यांनी गैरअर्जदारांविरुध्द शहर पो.स्टे. माजलगांव येथे तक्रार दिली. अर्जदार ही स्वत:चा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ आहे. तसेच गैरअर्जदार क्र.१ हा शिक्षक असून त्यास महिन्याकाठी ५०,०००/- रू. पगार मिळतो. तसेच त्याच्या कुटुंबाचे उत्पन्न वर्शाकाठी १५ ते २० लाख रु. येतात. त्यामुळे अर्जदारने दरमहा अंतरिम पोटगी म्हणून रक्कम रु.८,०००/- प्रतिमहिना मिळण्याची विनंती केली आहे.

**<u>गैरअर्जदारांचे संक्षिप्त कथन खालीलप्रमाणे:-</u>**

४. प्रस्तुत प्रकरणात गैरअर्जदारांनी नि.१६ वर आपले म्हणणे सादर केलेले असून अर्जदारने कथन केलेला सर्व मजकूर अमान्य व चुक असल्याचे कथन केले आहे. गैरअर्जदारांच्या कथनानुसार, लग्न झाल्यानंतर अर्जदार गैरअर्जदारासोबत सासरी राहत असतांना म्हणत असे की, माझ्या सोबत माजलगांव येथे राहण्यास चला, गैरअर्जदाराने तिच्यासोबत माहेरी राहण्यास इन्कार केला तर अर्जदार ही गैरअर्जदारांचा अपमान करून उलट सुलट बोलू लागली. अर्जदारास गैरअर्जदारांनी समजावण्याचा प्रयत्न केला परंतु अर्जदार ही दिवसेंदिवस गैरअर्जदारांना त्रास देत होती. गैरअर्जदार क्र.१ चे आईवडिल त्याचे भावासोबत पुणे येथे राहतात. जेव्हा ते अर्जदारास भेटण्यासाठी आले असता त्यांच्याशी देखील अर्जदार आरेरावाची भाषा करत असे. गैरअर्जदारांच्या कथनानुसार, अर्जदार हीस मुलबाळ होत नाही म्हणून तिला वेगवेगळ्या हॉस्पीटलमध्ये दाखविले व गैरअर्जदारने स्वत:ला इंटरनॅशनल हॉस्पीटल, औरंगाबाद येथे तपासणी करून उपचार घेतला.

५. गैरअर्जदाराचे पुढे कथन की, गैरअर्जदार हा कामावर गेला असतांना काहीही कारण नसतांना अर्जदार ही तिचे माहेरी निघून गेली. गैरअर्जदारांनी अनेक प्रयत्न करून देखील अर्जदार ही नांदायला आली नाही, तिने माहेरीच राहण्याचा हट्ट धरला. त्यामुळे तिच्या हट्टापायी गैरअर्जदार हा तिच्यासोबत तिच्या माहेरी लॉकडाउनच्या काळात राहिला. परंतु, तरी देखील अर्जदार गैरअर्जदाराशी चांगली राहिली नाही. त्यामुळे गैरअर्जदारने अर्जदारास परत औरंगाबाद येथे जावून राहू असे सांगितले परंतु अर्जदारने जाण्यास नकार दिला व वेगळे राहण्याचा हट्ट धरला. गैरअर्जदारने अर्जदार व तिच्या नातेवाईकांना विनवणी करून ऑक्टोबर २०२० मध्ये अर्जदारास नांदावयास घेवून गेला. परंतु, अर्जदाराच्या स्वभावात काही बदल झाला नाही. अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ यास छोट्या छोट्या कारणावरून मानसिक व शारिरीक त्रास देवू लागली व त्यास तिचे माहेरी जावून राहण्यासाठी जोरजबदरस्ती करू लागली.

६. गैरअर्जदाराचे पुढे कथन की, दि.२०.०२.२०२२ रोजी अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ ला न सांगता माहेरी माजलगांव येथे निघून गेली. अर्जदार ही माहेरी गेल्यानंतर गैरअर्जदार क्र.१ सोबत कोणताही संपर्क केलेला नाही. अर्जदार हिला तिच्या आईवडिलांनी कोणतेही सोन्या चांदिचे दागिने दिलेले नसून गैरअर्जदार यांनी तिला घातलेले सोन्या चांदिचे दागिने अर्जदार ही सोबत घेवून गेली. गैरअर्जदारांच्या कथनानुसार, दि.१०.०३.२०२२ रोजी गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार हीस नांदावयास आणणेकामी दारूलखाजा, इमारत-ए-शरिया, औरंगाबाद येथे तक्रार दाखल केली. त्याअन्वये अर्जदार हीस नोटीस देण्यात आली.त्यानंतर अर्जदार ही इमारत-ए-शरियामध्ये हजर झाली परंतु तिने तेथे खोटेनाटे सांगून चुकीचा जबाब दिला. त्यानंतर दि.१४.०५.२०२२ रोजी अर्जदार व गैरअर्जदार तसेच त्यांचे

नातेवाईकांसोबत बैठक झाली असता अर्जदार हीने नांदण्यास स्पष्ट नकार दिला. त्यानंतर देखील अर्जदारास नांदण्यास येण्याकामी एकदा दि.२६.०५.२०२२ रोजीची तारीख देण्यास आली मात्र सदर दिवशी अर्जदार ही कार्यालयात हजर झाली नाही. यावरून अर्जदार हीस नांदण्याची इच्छा राहिली नाही.

७. गैरअर्जदाराचे पुढे कथन की, गैरअर्जदार क्र.१ याने दि.०२.०६.२०२२ रोजी साक्षीदारांसमक्ष अर्जदारास तोंडी तलाक शब्द उच्चारून तलाक-ए-रजई दिला. सदर तलाक दिल्याबाबतची माहिती अर्जदार हिस रजि.पोस्टाद्वारे लेखी तलाकनामा पाठवून देण्यात आली. सदर नोटीस अर्जदारास प्राप्त झाली. त्यानंतर देखील अर्जदारास नांदण्यास येण्याकरिता समजावण्याचा प्रयत्न केला असता अर्जदारने स्पष्ट नकार दिला. त्यामुळे, अर्जदारची नांदण्याची इच्छा नसल्याचे दिसून येते. गैरअर्जदाराने दि.०३.०७.२०२२ रोजी साक्षीदारांसमक्ष अर्जदारास तलाक शब्द उच्चारून तलाक दिलेला असून त्याबाबत रजि.पोस्टाद्वारे तलाकनामा पाठवून देण्यात आला. त्याची प्रत अर्जदाने स्विकारली असून गैरअर्जदार व अर्जदार यांच्यामध्ये आजरोजी वैवाहिक नातेसंबंध राहिलेले नाही. दि.०४.०८.२०२२ रोजी गैरअर्जदाराने अर्जदारास तिसरा तलाक दिलेला आहे. त्यामुळे, मुस्लिम धर्मशास्त्रानुसार त्यांच्यातील वैवाहिक जिवन संपुष्टात आलेले आहे.

८. गैरअर्जदाराने धार्मिक शिक्षण घेतलेले असून तो हाफिज कुरान आहे व गैरअर्जदार लहान मुलांना धार्मिक शिक्षण देत असल्याने त्यास आजरोजी ७ ते ८ हजार रूपये महिना उत्पन्न मिळवित आहे. सदर उत्पन्नातून गैरअर्जदार त्याची व त्याच्या वयोवृध्द आईवडिलांची उपजिवीका भागवत आहे. तसेच अर्जदारास तलाक दिल्यानंतर गैरअर्जदाराने दुसरे लग्न केलेले असून त्याच्या दुस-या पत्नीची जबाबदारी देखील गैरअर्जदारावर आहे. अशा परिस्थितीत गैरअर्जदार हा अर्जदारास

पोटगी देण्यास असमर्थ आहे. तथापि, अर्जदार व गैरअर्जदार यांच्यातील नातेसंबंध संपुष्टात आलेले असल्याने अर्जदार पोटगी मिळण्यास कायदेशीर पात्र नाही. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजुर करणे योग्य व आवश्यक आहे.

९. अर्जदारातर्फे विद्वान वकिल श्री.आर.आर.साबळे यांचा युक्तीवाद ऐकला. या अर्जाचे निर्णयासाठी खालील मुद्दे निश्चीत केले असून त्यावरील निष्कर्ष कारणमीमांसेसह खालील प्रमाणे नमुद केलेले आहेत.

| अ.क. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| 1. | अर्जदार मागणी प्रमाणे उदरनिर्वाहासाठी अंतरिम पोटगी मिळणेस पात्र आहे काय ? असल्यास किती ? | ... होय. |
| 2. | आदेश काय ? | ...अंतिम आदेशाप्रमाणे. |

**कारणमिमांसा**

**मुद्दे क. 1 व 2 बाबत**

१०. अर्जदारांच्या विधीज्ञांनी युक्तीवाद केला की, अर्जदार ही लग्नानंतर तिचे सासरी नांदत असतांना गैरअर्जदार यांनी तिला शारिरीक व मानसिक त्रास दिल्यामुळे ती आजरोजी तिचे आईवडिलांकडे राहत आहे. गैरअर्जदार यांनी अर्जदारास टॅक्सी घेण्याच्या कारणावरून ६०,०००/- रु.ची बेकायदेशीर मागणी केली व त्याअनुशंगाने तिचा श्शारिरीक व मानसिक छळ केला असल्याने भा.द.वि. कलम ४९८-अ गुन्हा दाखल केला. त्यामुळे सकृतदर्शी गैरअर्जदार यांनी कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा अन्वये अर्जदारचा शारिरिक व मानसिक छळ केला असल्याचे दिसून येते. अर्जदार ही आजरोजी माहेरी राहत असून तिच्याकडे तिचे दैनंदिन खर्च भागविण्यासाठी कोणतेही साधन नाही. तसेच,

अर्जदारांचे आईवडिलांची आर्थिक परिस्थिती हालाकीची असल्याने ते अर्जदाराचा खर्च भावण्यास असमर्थ आहे. अशा परिस्थितीत गैरअर्जदार क्र.१ याने पती म्हणून अर्जदारास प्रतिमहिना ८,०००/– अंतरिम पोटगी देणे आवश्यक आहे. सबब सदरचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे.

११. गैरअर्जदाराचे विधिज्ञांनी युक्तीवाद केला की, अर्जात कथन केल्याप्रमाणे अर्जदारने गैरअर्जदाराचे उत्पन्न सिध्द करण्याकामी अभिलेखात कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. त्यामुळे, अर्जदाराचे कथनास पुष्ठी मिळत नाही. अर्जदार व गैरअर्जदार यांचा विवाह मुस्लिम धर्म शास्त्रानुसार संपुष्ठात आलेला असल्याने अर्जदारास गैरअर्जदाराकडे पोटगी मागता येणार नाही. सबब, सदरचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

१२. अभिलेखात दाखल असलेल्या कागदपत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दि.२३.०५.२०१६ रोजी अर्जदार व गैरअर्जदार यांचा मुस्लीम धर्म शास्त्रानुसार विवाह झालेला आहे. सदर विवाह गैरअर्जदारने नाकारलेला नसून अर्जदारास दि.०२.०६.२०२२ दि.०३.०७.२०२२ व दि.०८.०८.२०२२ रोजी तलाक दिलेला असून अर्जदार व गैरअर्जदार यांच्यामधील वैवाहिक नातेसंबंध संपुष्ठात आल्याचे कथन केले आहे. तसेच अर्जदारस गैरअर्जदाराकडे नांदण्यास स्वारस्य नाही. तसेच सतत किरकोळ कारणावरून अर्जदार गैरअर्जदाराबरोबर भांडणे करत असल्याने अर्जदार स्वत:हून तिचे माहेरी निघून गेलेली आहे. त्यामुळे, अर्जदार ही गैरअर्जदाराकडून पोटगी मिळण्यास पात्र नसल्याचे कथन केले आहे.

१३. प्रस्तुत ठिकाणी हे नमूद करणे महत्त्वाचे आहे की, मा. सर्वोच्च न्यायालयाने **शायराबानो वि. युनियन ऑफ इंडिया (२०१७) ९ एस.सी.सी.** या

केसमध्ये तलाक-ए-बिद्दल किंवा ट्रिपल तलाक एकतर्फी पतीने तीन वेळा तलाक उच्चारून एकतर्फी दिलेला घटस्फोट असंविधानिक ठरवलेला आहे. त्यामुळे, गैरअर्जदार यांनी नमूद केल्याप्रमाणे अर्जदारास एकतर्फी दिलेला घटस्फोट कायद्याच्या कसोटीवर टिकणारा नाही. अशा परिस्थितीत वैवाहिक संबंध विच्छेदन झाल्याबाबतचे गैरअर्जदाराचे कथन विचारात घेणे योग्य ठरणार नाही. उलटपक्षी अर्जदाराच्या कथनांचा विचार केला असता गैरअर्जदार यांच्याविरुध्द भा.द.वि कलम ४९८ अन्वये गुन्हा नोंद केला असल्याचे ती कथन करित आहे. त्यामुळे, प्रथमदर्शी गैरअर्जदार यांनी अर्जदाराचा छळ केला असल्याचे दिसून येते. त्याचबरोबर गैरअर्जदार याने दुसरे लग्न केल्याचे मान्य व कबूल केले असल्याने अर्जदारास होणा-या शारिरीक व मानसिक छळास पुष्ठी मिळते. निश्चितच अर्जदारास तिला होणा-या छळाबाबत योग्य तो पुरावा संपरिक्षेत दाखल करणे महत्त्वाचे आहे. परंतु, सध्य स्थितीत अर्जातील कथने व त्या पुष्ठ्यार्थ दाखल केलेल्या शपथपत्रावरुन गैरअर्जदार यांनी अर्जदारास कौटुंबिक हिंसाचार महिला संरक्षण कायद्या अन्वये छळ केला असल्याचे प्रथमदर्शी दिसून येते.

१४. अर्जदारांच्या कथनानुसार ती माहेरी राहत असून तिला उदरनिर्वाहाचे साधन नसल्याने ती तिचा स्वत:चा उदरनिर्वाह करू शकत नाही. परंतु, गैरअर्जदार क्र.१ हा शिक्षीत असून त्याला महिन्या काठी ५०,०००/- रु. पगार मिळतो. त्यामुळे, अर्जदारास प्रतिमहिना ८,०००/- रु. पोटगीची मागणी केलेली आहे. परंतु, अर्जदाराने त्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. अशा परिस्थितीत केवळ अर्जदाराचे अर्जातील कथनांवर विसंबून राहुन गैरअर्जदारास वर्षाकाठी सदरचे उत्पन्न मिळते असा तर्क काढणे न्यायोचित होणार नाही. गैरअर्जदारने त्याचे मालमत्ता व उत्पन्नाबाबतचे प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे. त्यामध्ये त्यास प्रतिमहिना ७,०००/- रु. उत्पन्न मिळत असल्याचे त्याचे कथन केलेले आहे. परंतु, सदर

प्रतिज्ञापत्रात नमूद करण्यात आलेल्या मासिक खर्चाचा विचार करता त्याचा प्रतिमहिना साधारन १५,०००/- रु. खर्च नमूद केला असल्याचे दिसून येते. त्यामुळे, उत्पन्न ७,०००/- रु. असतांना खर्च १५,०००/- रु.याबाबत तफावत आढळून येत असल्याचे सदर प्रतिज्ञापत्रातील नमूद करण्यात आलेला खर्चाचा व उत्पन्नाचा तपशिल याबाबात साशंकता निर्माण होते. तथा सदर बाब गैरअर्जदार यांनी संपरिक्षेत पुराव्यानिशी सिध्द करणे आवश्यक आहे. परंतु, अर्जदाराच्या उदरनिर्वाहाची तरतुद करणे हे गैरअर्जदारची पती या नात्याने कर्तव्य व जबाबदारी आहे. अर्जदाराचे अर्जातील कथन व गैरअर्जदाराची आर्थिक स्थिती पाहता अर्जदाराचे उपजीविकेसाठी व दैनंदिन खर्चाकरीता अर्जदार हिस दरमहा अंतरिम पोटगी म्हणून रक्कम रु. ३,०००/- देणे न्यायोचित ठरते असे माझे मत आहे. सबब मुददा क. १ बाबतचा माझा अभिप्राय होकारार्थी देवून मुददा क. २ च्या उत्तरार्थ खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) अर्जदारांचा अर्ज नि.क.३ अंशत: मंजूर करण्यात येत आहे.

२) गैरअर्जदार क.१ याने अर्जदार यांच्या उदर निर्वाहासाठी व जीवनावश्वक गरजेसाठी अंतरिम पोटगी म्हणून अर्जदार क. १ हीस दरमहा रक्कम रूपये ३,०००/- प्रकरण दाखल झालेल्या तारखेपासून द्यावेत.

RAHUL BALBHIM POL
Digitally signed by RAHUL BALBHIM POL
Date: 2026.03.27 17:44:31 +0530

माजलगाव.
दिनांक : २५/०३/२०२६.

( आर.बी.पोळ )
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग माजलगाव.

**CERTIFICATE**

"I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Judgment/order".

Dictated, transcribed, checked & signed on : 25/03/2026

Sd/-

Date: 25/03/2026

R.M.Shaikh
Gr-III Stenographer
Jt. Civil Court J.D.Majalgaon.